# अंजनगाव सुर्जी रेंजमध्ये वाघाचा मृत्यू

## मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट



चिखलदरा तालुक्यातील अंजनगाव सुर्जी रेंजमधील ही घटना आहे. वनविभागाचा चमु घटनास्थळी पोहोचला असून, पुढील तपास करीत आहेत. त्यांच्या अहवालानंतर वाघाचा मृत्यू कुठे झाला आणि कसा झाला. ही बाब माहिती पडेल.

**अग्रिम सैनी,**
**उपवनसरंक्षक, मेळघाट प्रादेशिक**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 )** – चिखलदरा तालुक्यातील अंजनगाव सुर्जी वनपरीक्षेत्रात पट्टेदार वाघाचा मृत्यू झाला. ही घटना 26 नोव्हेबर रोजी रात्री 7.30 वाजताच्या सुमारास उघडकीस आली. वनविभागाचा चमु रात्री घटनास्थळी पोहोचला होता. रात्री उशिरापर्यंत वनविभागाचा घटनास्थळी पंचनामा सुरु होता.

अंजनगाव सुर्जी वनपरीक्षेत्रातील पांढराखडका परिसरातील घनदाट जंगलात वनविभागाचे पथक गस्तीवर होते. दरम्यान त्यांना एका ठिकाणी वाघ मृतावस्थेत आढळून आला. त्यांनी तत्काळ या घटनेची माहिती वरिष्ठ वनाधिकारी यांना दिली. त्यानंतर वनविभागाच्या चमुने घटनास्थळाचा पंचनामा सुरु केला. घनदाट जंगलात वाघ मृतावस्थेत आढळून आल्याने, वनाधिकारी यांना घटनास्थळी पोहोचण्यास बरेच परिश्रम घ्यावे लागले. वाघाचा मृत्यू कसा झाला, याबाबत अद्याप माहिती पुढे आली नाही. त्या अनुषंगाने वनविभागाचा चमु तपास करित आहे.

# चेनस्रॅचरचे टार्गेट मजूर महिला

## शेतात जाणाऱ्या महिलेची 21 ग्रॅम सोन्याची चेन हिसकली

### 15 दिवसात दुसरी घटना



### महिलेला खाली पाडून हिसकले होते मंगळसूत्र

12 नोव्हेंबर रोजी सकाळी 10.30 वाजता घडली. वलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील विर्शी ते आष्टी रस्त्यावर शेतातील पायी जाणाऱ्या महिलेला गावाचा पत्ता विचारला. त्यानंतर तिला लाथ मारून खाली पाडून तिच्या गळ्यातील 4 ग्रॅमचे मंगळसूत्र हिसकावून पळून गेले होते.बरोबर 15 दिवसांनी मंगळवारीच ही दुसरी घटना घडली. या चोरट्यांनी वलगाव पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे.

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 )** – मंगळसुत्र चोरट्यांनी शेतात मजूरीसाठी जाणाऱ्या महिलांना लक्ष्य करित त्यांच्या गळ्यातील मंगळसुत्र हिसकावणे सुरु केले आहे. वलगाव पोलीस स्टेशनअंतर्गत या चोरट्यांनी पंधरा दिवसात सलग दुसऱ्यांदा शेतमजूर महिलेच्या गळ्यातील मंगळसुत्र हिसकाविण्याची घटना घडवून आणली. वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आष्टी ते देवरी रस्त्यावर शेतात जाणाऱ्या महिलेला दोन अज्ञात तरुणांनी पत्ता विचारण्याच्या बहाण्याने अडवून 21 ग्रॅम सोन्याची चेन हिसकावून नेली. ही घटना 25 नोव्हेंबर रोजी दुपारी 3.30 वाजता घडली. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चेन स्नॅचरविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

वलगाव पोलीस ठाणे हद्दीतील रहिवासी महिला 25 नोव्हेंबर रोजी दुपारी आष्टी ते देवरी रस्त्याने आपल्या शेताकडे जात होती. तो आपल्या शेतात पोहोचताच मागून मोटारसायकलवरून दोन तरुण आले. पत्ता विचारण्याच्या बहाण्याने त्यांनी महिलेच्या गळ्यात अचानक कोयत्याने वार करून 75 हजार रुपये किमतीची 15 ग्रॅम सोन्याची चेन व 30 हजार रुपये किमतीचे 6 ग्रॅमचे मंगळसूत्र असा एकूण 21 ग्रॅम सोन्याची चेन घेऊन पळ काढला. घटनेनंतर महिलेने आरडाओरडा सुरू केला, मात्र दुपारची वेळ असल्याने तिचा आवाज कोणीच ऐकला नाही आणि चेन स्नॅचर भरधाव वेगाने पळून गेले. हिसकावून घेतलेल्या मालाची किंमत एक लाख 50 हजार रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेनंतर महिलेने रात्री वलगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी दोन अज्ञात चेन स्नॅचरविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# दोन हजाराची लाच स्विकारतांना पीएसआय अटकेत

## जिल्हा परिषदेसमोर एसीबीची यशस्वी कारवाई



### या पथकाची कामगिरी

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधिक्षक मारुती जगताप यांच्या मार्गदर्शन अप्पर पोलीस अधीक्षक सचिन्द्र शिंदे, पोलीस उपअधीक्षक मंगेश मोहोड, पोलीस निरीक्षक केतन मांजरे, पोलिस शिपाई शैलेश कडू, कृणाल काकडे, अतुल टाकरखेडे, महेंद्र साखरे, चालक पोलिस हवालदार जनबंधू यांनी केली. शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने केले आहे.

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 )** – पोलिस तक्रारीच्या अनुषंगाने मदत करून प्रकरण मिटविण्यासाठी दोन हजाराची लाच स्विकारणार्या एका पोलिस उपनिरीक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केली. नागपूरी गेट पोलिस ठाण्यातील पोलिस उपनिरीक्षक चंदन सोनाजी मोरे असे आरोपी लोकसेवकाचे नाव आहे. जिल्हा परिषद कार्यालया समोर 26 नोव्हेबर रोजी हा सापळा यशस्वी करण्यात आला.

तक्रारदार यांच्याविरुद्ध नागपुरी गेट पोलिस ठाण्यात एक गुन्हा दाखल असून या गुन्ह्यात तक्रारदार यांच्या बाजूने तपास करून प्रतिबंधात्मक कार्यवाहीमध्ये मदत करण्यासाठी तसेच नमुद प्रकरण मिटवण्यासाठी तक्रारदार यांना 10 हजाराची लाच मागणी केली जात असल्याची तक्रार 25 नोव्हेबर रोजी एसीबीला मिळाली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने एसीबीच्या पथकाने पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कार्यवाहीत केली असता, आरोपी लोकसेवक चंदन मोरे यांने एका गुन्ह्यात तक्रारदार यांच्या बाजूने तपास करून प्रतिबंधात्मक कार्यवाहीमध्ये मदत करण्यासाठी तसेच नमुद प्रकरण मिटवण्यासाठी तडजोडीअंती तक्रारदार यांना 2 हजाराची लाच मागणी केली आणि लाच स्वीकारण्याची तयारी दर्शविली. या पडताळणीनंतर एसीबी पथकाने सापळा रचून लोकसेवक चंदन मोरे यांना तक्रारदाराकडून 2 हजाराची स्वीकारताना ताब्यात घेतले. आरोपीविरुद्ध गाडगेनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## आरोग्य केंद्रातील लाचखोर कनिष्ठ सहाय्यक अटक


सेवानिवृत्त मृत्यू उपदान रकमेची थकबाकीचे बिल काढून देण्यासाठी 10 हजाराची लाच मागून 5 हजाराची लाच स्विकारणार्या आरोग्य केंद्रातील कनिष्ठ सहायकास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने 26 नोव्हेबर रोजी अटक केली. स्वप्नील रमेशराव कुर्हेकर (39, रा. शिक्षण कॉलनी वार्ड नं. 5. मु.पो. तिवसा जि.अमरावती) असे आरोपी लोकसेवकाचे नाव आहे. ते माहुली जहागीर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र कनिष्ठ सहायक पदावर कार्यरत आहे. तक्रारदार हे अनुकंपा तत्त्वावर नोकरीमध्ये लागलेले असून त्यांचे वडील हे परिचर पदावर माहुली जहागीरच्या प्राथमिक आरोग्य केंद्रावर कार्यरत होते. सन 2016 मध्ये त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्याच्या सेवानिवृत्त मृत्यू उपदान रकमेची थकबाकी 48 हचार रुपये ही बाकी होती. ते बिल काढून देण्यासाठी कनिष्ठ सहायक स्वप्निल कुर्हेकरने तक्रारदाराला 10 हजार रुपयांची मागणी केली. त्यानंतर बिल काढून देण्यापूर्वी 5 हजार रुपयांची लाच स्विकारली, तर उर्वरित लाचेची रक्कम बिल काढल्यावर देणे होते. तक्रारदार यांचे सदर बिल निघाले असून बिल काढून देण्याचा मोबदला, कनिष्ठ सहायक हे तक्रारदार यांना 5 हजार रुपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार 26 नोव्हेबर रोजी एसीबीला मिळाली. त्यानुसार एसीबी पथकाने पडताळणी केली असता, कनिष्ठ सहाय्यक कुर्हेकरने तडजोडी अंती दोन हजाराची लाच स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर एसीबीने सापळा कार्यवाही स्वप्नील रमेशराव कुर्हेकरला लाच स्विकारले. त्यामुळे एसीबीने त्याला ताब्यात घेतले. त्यांच्याविरुद्ध माहुली जहागीर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## महिलेची सोन्याची पोत लंपास

**अमरावती** – मालखेड येथे पेंशन आणण्याकरिता गेलेल्या महिलेचे 3 ग्रॅमची सोन्याची पोत चोराने लंपास केली. या घटनेची तक्रार ग.भा.गनोबाई चव्हाण (72, रा. लालखेड) यांनी 23 नोव्हेबर रोजी चांदुररेल्वे पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी दोन अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# लोखंडी पेटीतून 2.90 लाखांचे दागिने चोरी

## गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.26 )**– गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या महिलेच्या घरातील लोखंडी पेटीतून अज्ञात चोरट्यांनी 2.90 लाख रुपयांचे दागिने चोरून नेले. ही घटना 20 एप्रिल 2024 ते 23 नोव्हेंबर 2024 दरम्यान घडली होती. याप्रकरणी महिलेने 25 नोव्हेंबर रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

20 एप्रिल 2024 रोजी गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या महिलेने 25 हजार रुपये किमतीची 7 ग्रॅम किमतीची सोन्याची अंगठी, 1 लाख 20 हजार रुपये किमतीची 3 तोळे किमतीची सोन्याची चेन, 60 हजार रुपये किमतीची 15 ग्रॅमची आणखी एक साखळी लंपास केली होती. तिच्या घरात असलेल्या लोखंडी पेटीत या कानातल्यांची किंमत 25 हजार रुपये, 5 ग्रॅमची अंगठी 20 हजार रुपये, इतर सोन्याची 11 ग्रॅम किंमत 40 हजार रुपये असे 2 लाख 90 हजार रुपयांचे दागिने ठेवले होते. मात्र अज्ञात चोरट्यांनी लोखंडी पेटीतून हे दागिने चोरून नेले. 23 नोव्हेंबर रोजी महिलेने बॉक्स उघडला असता दागिने दिसले नाही. त्यानंतर महिलेने गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## मंगळसुत्र लंपास

**अमरावती** – दर्यापूर बसस्थानकावरून दहिगाव जाणार्या निघालेल्या एका महिलेचे 70 हजाराचे सोन्याचे मंगळसूत्र आणि 1 हजाराची रोख असा एवज चोराने लंपास केला. हर्षा अजय किरकटे यांनी या घटनेची तक्रार दर्यापूर पोलिस ठाण्यात दिली.

# लाडकी बहिणीचा 44 कोटींचा अतिरिक्त भार

## योजनेत 600 वाढल्याने महिन्याचा बजेट 154 कोटींवर



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 )**– विधानसभा निवडणुकीवर लाडकी बहीण योजनेचा पूर्ण इम्पॅक्ट झाला आहे. महायुती सरकारने या योजनेत बसणाऱ्या सर्व महिलांना पूर्वी दीड हजार रुपये महिन्याचा निधी दिला. सरकार आले, तर वाढीव 600 रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे. यामुळे सरकारला महिलांच्या खात्यात अतिरिक्त 44 कोटी रुपये टाकावे लागणार आहे. दर महिन्याचा बजेट 154 कोटींवर जाणार आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत पूर्वी 1500 रुपये महिना दिला जात होता. नव्याने सरकार आल्यावर 2100 रुपये दरमहा निधी देण्याची घोषणा केली. यामुळे नव्याने सरकार येताच सरकारला लाडक्या बहिणीसाठी अतिरिक्त 600 रुपये मोजावे लागणार आहे. यासाठी सरकारला जिल्ह्यातील महिलांसाठी 44 कोटींची तरतूद करावी लागणार आहे. यापूर्वी महिलांचे मत कुटुंब प्रमुखाने सांगितल्यानुसार कुठल्या तरी पक्षाला दिले जात होते. अनेक महिला मतदार मतदानाकरिता येत नव्हत्या. आता मात्र हे चित्र बदलताना पाहायला मिळत आहे. योजनेत समाविष्ट महिलांना मुख्यमंत्री, उपमुख्यमंर्त्यांचा दूरध्वनी निवडणुकीच्या काळात आला. महायुतीच्या उमेदवाराला निवडून द्या, पुढील काळात 2100 रुपये दरमहा दिले जातील, असे सांगितले गेले. यामुळे महिलांचा विश्वास आणखी वाढला. सरकार गेले, तर आपल्याला लाडकी बहीण योजनेतून पैसे मिळणार नाहीत. यामुळे महिलांनी महायुतीच्या उमेदवाराच्या बाजूने मतदान केले. याचा परिणाम मतपेटीतून दिसून आला.

# कार्यकर्त्यांनों हताश होऊ नका, पुढील वाटचासाठी सज्ज व्हा!

## शहर काँग्रेसच्या बैठकीत पदाधिकाऱ्यांनी दिला कानमंत्र | निवडणुकीतील पराभवानंतर पार पडली मंथन बैठक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 26 )**– कार्यकर्त्यांनी निसटत्या पराभवाने हताश न होता नवीन जोमाने पुढील वाटचाल करण्यासाठी सज्ज व्हावे,असे आवाहन मंगळवारी (दि.26) अमरावती शहर जिल्हा काँग्रेस कमिटी कार्यकारिणीच्या बैठकीत पदाधिकार्यांनी कार्यकर्त्यांना उद्देशून केले. शहराध्यक्ष बबलु शेखावत यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली.नुकत्याच झालेल्या अमरावती विधानसभा निवडणुकीत काँग्रेस उमेदवारांचा निसटता पराभव झाला.त्यानंतर पहिल्यांदाच ही बैठक आयोजित करण्यात आली होती. विधानसभा निवडणूक 2024 नुकतीच संपन्न झाली.यामध्ये काँग्रेस पक्षाने महाराष्ट्रातील जनतेकरिता पंचसूत्री जाहिरनाम्यात मोठ्या व सुलभ योजनेचे नियोजन केले होते.मतदारांनी भरपूर प्रमाणात काँग्रेसला मतदान केल्याचे सुद्धा सिद्ध झाले.तसेच अमरावती विधानसभा निवडणुकीत देखील शहरातील जनतेने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला मोठ्या प्रमाणात समर्थन देखील दिले. त्यामुळे काँग्रेस पक्ष पुढे जनतेकरिता एकजुटीने काम करेल, असे मत काँग्रेसच्या नेत्यांकडून आजच्या बैठकीमध्ये मांडण्यात आले.



बैठकीला प्रामुख्याने मंचावर अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलु शेखावत,माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख,माजी महापौर विलास इंगोले,प्रदेश प्रवक्ते दिलीप येडतकर,माजी महापौर मिलिंद चिमोटे,प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार,प्रदेश महासचिव किशोर बोरकर,माजी महापौर अशोक डोंगरे,महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे उपस्थित होते.

दरम्यान भारतीय संविधान दिवसानिमित्त विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून 26/11 च्या भ्याड हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांना आदरांजली देण्यात आली.याप्रसंगी प्रामुख्याने विनोद मोदी, प्रदीप हिवसे, मुकेश गिरी, सलीम बेग, वंदना कंगाले, शोभा शिंदे,अस्मा परवीन सुजाता झाडे,योगिता गिरासे शिरीन खान,वंदना थोरात अनिला काजी,लक्ष्मी अहिरे,शिल्पा राऊत,अपर्णा मकेश्वर,कांचन खोडके,नजीर खान बी.के,रविंद्र इंगोले,नौशाद अली,धीरज हिवसे,अब्दुल रऊफ,रवींद्र शिंदे,अरुण जयस्वाल,सुनील जावरे,विजय वानखडे,गोपाल धर्मळे,गजानन जाधव,विजय खंडारे,अरुण बनारसे,पंकज मेश्राम,सादिक शाह,समीर जवंजाळ, अतुल काळबेंडे,निलेश गुहे,वैभव देशमुख, संकेत कुलट, संकेत साहू,बी.टी.अंभोरे,प्रदीप अरबट, विजय बर्वे,अनिल देशमुख,अनिल तायडे,नाना बारबुद्धे, अमर भेर्डे,प्रकाश वानखडे, मेराज खान पठाण, रणजीत इंगळे,सुरेश गुप्ता,किशोर रायबोले, अभिनंदन पेंढारी, डॉ.मतीन अहेमद, डॉ. आबीद हुसैन,मोहम्मद निजाम, सुरेश इंगळे, मोहन पुरोहित, विकास निनावे, देवेंद्र पवार, निशांत पवार, विकास डोंगरे, दीपक हुंडीकर,सुरेश धावडे, सुजल इंगळे, यश तायडे, सतीश काळे,लखन यादव,सचिन निकम,विजय आठवले,संदीप मानकर यांच्या सह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, ( रामेती ) अमरावती

(कृषि मंत्रालय, महाराष्ट्र शासन अंतर्गत स्वायत्त संस्था)

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ रोड, कृषि संकुल, कॅम्प, अमरावती दुरध्वनी क्रमांक 0721-2952863, ई-मेल rameti_amravati@rediffmail.com

### ई-निविदे बाबत जाहीरात

प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, (रामेती) अमरावती, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ रोड, कृषि संकुल, कॅम्प अमरावती येथे भोजन व्यवस्था करण्याकरीता वार्षिक कंत्राट करावयाचे आहे. त्याकरीता ऑनलाईन पध्दतीने ई-निविदा दिनांक 27/11/2024 ते 10/12/2024 रोजी सायंकाळी 17.00 वाजता पर्यंत मागविण्यात येत आहेत. निविदा फॉर्मची किंमत रु.5400/- (अक्षरी-पाच हजार चारशे रुपये फक्त) असून तो देखील ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहे. ई-निविदा संच तसेच याबाबतची माहीती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सर्व ऑनलाईन प्रक्रीया याच संकेतस्थळावरुन करावयाची आहे. निविदा उघडण्याची वेळ या कार्यालयात दिनांक 11/12/2024 रोजी दुपारी 12.00 राहील.

**( विजय चंवाळे )**
**प्राचार्य**
**प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन,**
**प्रशिक्षण संस्था, ( रामेती ) अमरावती**

**विमाका/अम./जाही./754**

# ॲपवरुन समजेल रुग्णवाहिकेचे लोकेशन!

## एका क्लिवर बोलाविता येणार रूग्णवाहिका



### मिळणार भ्रमणध्वनी क्रमांक

ॲपवरुन रुग्णवाहिका बोलवि- ल्यानंतर तत्काळ चालकाचा किंवा त्यातील डॉक्टरचा भ्रमणध्वनी क्रमांक मोबाइलवर उपलब्ध होणार आहे.

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.26 )** – शहर आणि ग्रामीण भागातील नागरिकांना तत्काळ आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी यासाठी सुरू करण्यात आलेली 108 रुग्णवाहिका आता अद्ययावत करण्यात येणार आहे. %108 रुग्णवाहिका मोबाइल ॲपद्वारेही उपलब्ध असेल. या ॲपवरून रुग्णवाहिका कुठपर्यंत आली याची माहिती सहज उपलब्ध होणार आहे. मार्च 2025 पासून सेवा सुरू होणार आहे.

राज्यभरात 108 रुग्णवाहिका फार मोलाची भूमिका बजावत आहे. मात्र, बऱ्याचदा 108 दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून रुग्णवाहिका बोलविल्यानंतर ती नेमकी कुठपर्यंत पोहोचली आहे, तिला पोहोचायला किती वेळ लागेल हे समजत नाही. त्यामुळे रुग्णाचे नातेवाईक रुग्णवाहिकेची वाट न पाहता मिळेल त्या वाहनाने रुग्णालय गाठण्याचा प्रयत्न करतात. रुग्णांच्या नातेवाइकांचे होणारे हाल लक्षात घेत 108 रुग्णवाहिका सहज उपलब्ध व्हावी यासाठी मार्च 2025 पासून मोबाइल ॲपची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. भविष्यात या ॲपमध्ये खासगी रुग्णालयांचा समावेश करण्याची प्रक्रिया आता सुरू करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# दर्यापुर मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलणार

## जिल्ह्यात भाजप मजबूत की, युवा स्वाभिमान ?

■ प्रविण बोके ■

अंजनगाव सुर्जी, ( दि.26 ) -दर्यापुर विधानसभेची निवडणूक शांततेत पार पडली. गेल्या एक महिन्यापासून असलेली उत्सुकता 23 तारखेला लागलेल्या निकालामुळे संपली आणि दर्यापुर मतदार संघाला एक नविन चेहरा आमदार म्हणुन मिळाला.परंतू या निवडणूकीने मतदार संघात अनेक नविन राजकीय समिकरणांना जन्म दिला असुन भविष्यात होर्णाया स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत याचा परिणाम दिसण्याची शक्यता वर्तवल्या जात आहे.

गजानन लवटे या नविन चेर्हयाच्या रुपाने जनतेच्या मनात असलेला आमदार मिळाला यात शंका नाही. पुर्वाश्रमीच्या आक्रमक आणि कट्टर हिंदुत्ववादी असलेल्या शिवसेनेतून गजानन लवटेसारख्या कार्यकर्त्याचा जन्म झाला आणि आज एक सेक्युलर धर्मनिरपेक्ष चेहरा म्हणुन जनतेनी भरभरुन मतदान लवटे यांना दिले. सुरवातीला माजी आमदार अभिजीत अडसूळ यांना



मिळालेल्या शिवसेनेच्या उमेदवारीने आणि शेवटपर्यंत हा मतदार संघ आघाडीत कुणाला सुटणार या चर्चेने अभिजीत अडसूळ यांचे पारडे जड वाटत असतांना मतदार संघातील भाजपाने आपल्या मनात नविनच काही तरी शिजवण्याचे सुरु केले आणि भाजपाचे माजी आमदार रमेश बुंदिले यांना युवा स्वाभिमान पक्षावर निवडणुकीत उतरविले. त्यामुळे अभिजीत अडसूळ हे सुरवातीपासुनच मागे पडत गेले ते कायमच ! अभिजीत अडसूळ यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी भाजप पदाधिर्काायांनी फिरविलेली पाठ



यामुळे पहील्या दिवसापासुनच अडसूळ पिता-पुत्र अस्वस्थ असल्याचे जाणवत होते. हे बंड रोखण्याचे काम अडसूळ पिता-पुत्रांनी दिल्लीपर्यंत केले. पण राणा दाम्पत्याचे वजन महायुतीमध्ये अडसूळ पेक्षा जास्त असल्याचे दिसून आले. खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सुद्धा या बंडाला रोखू शकले नसल्याने वरिष्ठांच्या आशिर्वादानेच हा कार्यक्रम सुरु असल्याची चर्चा गावागावात पोहोचली आणि शेवटी राणांना जे हवे होते तेच झाले. माजी आमदार बुंदिले विजयी झाले असते तर एका आमदाराची संख्या वाढली असती यात शंका नाही. परंतू बुंदिले निवडून



येण्यापेक्षा अडसूळांचा विजय रथ रोखणे हा मुख्य उद्देश मतदार संघातील भाजपा आणि राणा दाम्पत्याचा असल्याचे अनेक भाजप कार्यकर्त्यांच्या तोंडून ऐकायला मिळत होते आणि त्यात ते यशस्वी झाले. महायुतीचा धर्म पाळण्यासाठी भाजपचे काही पदाधिकारी अभिजीत अडसूळ यांचा प्रचार करतांना दिसले, पण काम मात्र बुंदिले यांचेच केल्याचे दिसुन आले. अडसूळांना मिळालेली मते ही अडसूळ यांच्या नियोजनाच्या आणि आर्थिक शक्तीच्या जोरावर मिळाली अशी चर्चा मतदार संघात आहे. तर गजानन लवटे यांना मतदार संघातील मतदारांनी दिलेली मते ही एक सर्वसामान्य कार्यकर्ता आणि शिवसेनेसोबत कायम असलेल्या मतदारांची मते आणि महाविकास आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांनी एकत्रीत केलेल्या कामाची फलश्रुती आहे. त्यामुळे प्रकाश पाटील भारसाकळे यांनी अकोट-तेल्हारा मतदार संघाच्या निवडणुकीत व्यस्त असतांनाही महायुतीचा धर्म न पाळता बंडखोर रमेश बुंदिले यांना निवडणुकीत विजयी करण्याचे आव्हानही काम करु शकले नाही. त्यामुळे ही निवडणुक खर्या अर्थाने जनतेनेच लढविली आणि गजानन लवटे यांचा विजय निश्चित केला. भाजपच्या कार्यकर्त्यानी युवा स्वाभिमान पक्षाच्या झेंड्याखाली येत माजी आमदार रमेश बुंदीले यांना विजयाच्या शिखरापर्यंत नेऊन पोहचविले होते. ज्यामुळे मतदार संघातील गावागावात आता युवा स्वाभिमान पक्षाचे कार्यकर्ते निर्माण झाले. हे होणे अपेक्षितच होते. माजी आमदार रमेश बुंदिले आता युवा स्वाभिमानचे सदस्य आहेत. त्यामुळे येर्णाया स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांमध्ये मतदार संघात भाजपापेक्षा युवा स्वाभिमानचे वर्चस्व वाढेल यात शंका नाही. संपुर्ण जिल्ह्यातील परिस्थिती पहाता राणा दाम्पत्याचे वर्चस्व अमरावती जिल्ह्यात वाढले, ज्याला आता कोणीच रोखु शकत नाही.

या निवडणुकीत झालेल्या महायुतीच्या विभाजनाचा फायदा युवा स्वाभिमानला होणार याचा भाजप कार्यकर्त्यांनी केव्हाच विचार केला नसेल. अडसूळ यांना पाडण्याच्या द्वेषाने आपण आपल्या पायावर तर कुर्हाड मारत नाही ना याची चाहुल भाजप कार्यकर्यांना लागली नाही, असे एका कॅडर भाजप कार्यकर्त्यांने बोलतांना चिंता व्यक्त केली. तरी येर्णाया काळात राज्यातील समिकरणे कशी बदलतात, यावर दर्यापुर विधानसभा मतदार संघाच्या स्थानीक स्वराज्य संस्थाचे भविष्य ठरेल. मात्र 2024 च्या झालेल्या निवडणुकीने मतदार संघातील अनेक नवनविन राजकीय समिकरणांना जन्म दिला यात शंका नाही.

# संविधान दिनी किसान मजूर कामगारांची निदर्शने

## संयुक्त किसान मोर्चा व कामगार संघटना कृती समितीचे आंदोलन




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.26 )** - संयुक्त किसान मोर्चा व कामगार संघटना कृती समितीने संविधान दिनी केंद्र व राज्य सरकारविरुध्द जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने केली.

शेती पिकांकरिता कायदेशीर खरेदी हमीसह किमान आधार भाव घोषित करा कामगार विरोधी चार श्रमसंहिता मागे घ्या, कंत्राटीकरण थांबवा, संघटित, असंघटित, योजना कर्मचारी, कंत्राटी कामगार, कृषी क्षेत्रातील मजुरांकरिता राष्ट्रीय स्तरावर 26 हजार रुपये महिना किमान वेतन आणि दहा हजार रुपये प्रति महिना पेन्शन आणि सामाजिक सुरक्षा लागू करा, कर्जबाजारी पण आणि शेतकरी आत्महत्या संपविण्याकरिता किसान व शेतमजुरांकरीता सर्व समावेशक कर्जमाफी, किसान मजुरांकरता कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून द्या, संरक्षण, आरोग्य, शिक्षण, विजेसह सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम व सार्वजनिक सेवांचे खाजगीकरण थांबवा. राष्ट्रीय मुद्रिकरण पाईपलाईन एमएमपी समाप्त करा, कोणतेही प्रीपेड स्मार्ट मीटर नको कृषी पंपाकरिता वीज पुरवठा मोफत, घरगुती व लहान दुकानांकरिता 300 युनिट पर्यंत मोफत वीज पुरवठा करा, डिजिटल कृषी मिशन, राष्ट्रीय सहयोग धोरण आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांसोबत आयसीएआर करार जे राज्य सरकारच्या अधिकारावर अतिक्रमण करीत आहे आणि शेतीच्या कंपनीकरणाला चालना देत आहे.

त्यांना समाप्त करा, अंदाधुंद भूसंपादन बंद करा आणि विशेष भूसंपादन कायदा 2013 आणि एफआरए लागू करा, सर्वांना रोजगार आणि नोकरीच्या सुरक्षेची हमी द्या, मनरेगा मध्ये 200 दिवस काम आणि 600रुपये प्रतिदिन मजुरी द्या व याचा शहरीक्षेत्रात विस्तार करा अश्या विविध मागण्याकरिता हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये महाराष्ट्र राज्य किसान सभा, अखिल भारतीय किसान सभा, आयटक, नवजागरण मनिशी संघटना, सीटू, भारतीय खेत मजदूर युनियन, मराठा सेवा संघ, किसान पुत्र आंदोलन आम आदमी पार्टी, भीम क्रांती संघटना ,जय विदर्भ पार्टी आदी संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होते. आंदोलनामध्ये अशोक सोनारकर डॉ.ओमप्रकाश कुठेमाटे, जगदीश आत्राम, निळकंठ ढोके, सतीश ढोके, उमेश बनसोड, सुनील देशमुख, देविदास राऊत, सतीश ढोरे, राहुल खोडके, किशोर पेंढारकर, वैभव सरोदे, मुन्ना वाघमारे, किसना खडसे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# रेल्वे भरती परीक्षेसाठी 10 विशेष गाड्या

## ■ उमेदवारांसाठी विशेष व्यवस्था

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.26 )** - अमरावती जिल्ह्यातून रेल्वे भरती परीक्षेसाठी जाणार्‍या उमेदवारांसाठी रेल्वे विभागाने 10 विशेष गाड्यांची व्यवस्था केली आहे. रेल्वे भरती मंडळाने (आरआरबी) घेतलेल्या परीक्षेसाठी मोठ्या संख्येने उमेदवार मुंबईत येत असल्याच्या संकेतांमुळे, मध्य रेल्वेने त्यांच्या सोयीसाठी 10 विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. मध्य रेल्वेनेही या प्रकाराचे नियोजन केले आहे.

बर्‍याच कालावधीनंतर मध्य रेल्वे भरती



मंडळ विविध पदांसाठी परीक्षा घेणार आहे. त्यामुळे उमेदवारांनीही मोठ्या प्रमाणात अर्ज केले आहेत. त्यांना वेळेवर परीक्षेला बसणे शक्य व्हावे, यासाठी 23 नोव्हेंबरपासून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई आणि नागपूर दरम्यान 10 आरआरबी विशेष गाड्या सुरू करण्यात येणार आहेत. 01103 क्रमांकाची विशेष गाडी 23 ते 27 नोव्हेंबर दरम्यान दररोज दुपारी 3.30 वाजता मुंबईहून सुटेल आणि दुसर्‍या दिवशी सकाळी 10 वाजता नागपूर स्थानकात पोहोचेल. त्याचप्रमाणे विशेष रेल्वे क्रमांक 1104 आरआरबी विशेष गाडी 24 ते 28 नोव्हेंबर दरम्यान नागपूर स्थानकातून दररोज दुपारी 1.30 वाजता सुटेल आणि दुसर्‍या दिवशी सकाळी 10.50 वाजता मुंबईला पोहोचेल. या दोन्ही गाड्या दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिकरोड, मनमाड, चाळीसगाव, जळगाव, भुसावळ, मलकापूर, जलंब, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा आदी स्थानकांवर थांबतील. दोन्ही ट्रेनमध्ये 8 द्वितीय श्रेणीचे डबे असतील ज्यात दोन थर्ड एसी, 8 स्लीपर, 2 ब्रेक व्हॅन असतील.

# शेतात ठेवलेल्या कापसाची चोरी

**अमरावती** - येवदा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शेताच्या आवारातून कापूस पीक अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. शेतकर्‍याच्या तक्रारीवरून येवदा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. एकीकडे कर्जाच्या ओझ्याने शेतकरी हैराण झाला होता आणि त्यातही शेतकरी वर्गाने पीक घेण्यासाठी कर्ज घेतले. नैसर्गिक आपत्ती आणि वन्य प्राण्यांपासून संरक्षण करून आपले पीक घरी आणण्यासाठी थांबलेल्या शेतकर्‍याच्या शेतातील कपाशीचे पीक चोरट्यांनी चोरून नेले. निवडणुकीच्या काळात शेतकर्‍याने शेतीकडे लक्ष दिले नाही. त्याचा फायदा घेत चोरट्यांनी पांढरे सोने म्हणजेच कापूस चोरून नेला. येवडा येथील शेतकरी जकाउल्ला खान साबीर खान यांच्या चार एकर शेतातील कापूस अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला आहे. निराश झालेल्या शेतकर्‍याने पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अशा घटना टाळल्या पाहिजेत आणि आवारातील चोरांवर अंकुश ठेवला पाहिजे.

# जिल्ह्यात संविधान दिवसानिमीत्त जिल्ह्यात विविध कार्यक्रम

## उद्देशिकेचे वाचन करुन घेतली शपथ

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती,( दि.26 )- भारतीय इतिहासात 26 नोव्हेंबर हा एक अत्यंत महत्वाचा दिवस आहे. 1949 मध्ये या दिवशी भारतीय संविधान स्विकारण्यात आले आणि 1950 मध्ये ते लागू झाले. प्रत्येक वर्षी 26 नोव्हेंबरला संविधान दिन साजरा केला जातो. हा दिवस केवळ संविधानाचा सन्मान करण्यात नाही, तर त्याच्या तत्वांवर विचार करण्याचा आणि भारतीय लोकशाहीला सशक्त करण्याचा आहे. संविधान दिन हा दिवस भारतीय संविधानाच्या ऐतिहासिक महत्वाची आठवण करुन देतो आणि त्याच्या तत्वांवर विचार करण्यासाठी एक विशेष दिवस आहे. हा दिवस संविधानाचा सन्मान करण्याचा आणि भारतीय लोकशाहीच्या पायाभूत तत्वांचा आदर करण्याचा आहे. या दिवसाच्या औचित्यावर जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये आणि इतर संस्था या दिवशी विविध कार्यक्रम आयोजित केले होते. यामध्ये संविधनाच्या महत्वावर चर्चा करत, उद्देशिकेचे वाचन करुन शपथ घेण्यात आले.*

## संविधान दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना उजाळा

**अमरावती** - संविधानिक मुल्यांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी 26 नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने आज सकाळी विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले.

यावेळी अपर आयुक्त संजय पवार, उपायुक्त गजेंद्र बावणे, संतोष कवडे, राजू फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे,



सुशील आग्रेकर यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

26 नोव्हेंबर 1949 रोजी भारताने संविधान स्वीकारले. या घटनेला आज 75 वर्षे पूर्ण होत आहेत. भारतीय संविधान व त्यातील मुल्य, हक्क-अधिकार व कलम यासंबंधी सर्वांना माहिती होण्यासाठी शासनाने जिल्ह्यात संविधान मंदिरांची उभारणी केले असल्याचे सांगून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना पाण्डेय यांनी उजाळा दिला.

## संविधान उद्देशिकेचे वाचन करून जनजागृती




**अमरावती** - संविधानिक मुल्यांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी 26 नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने आज सकाळी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवनात भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. अपर जिल्हाधिकारी सुरज वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी महसूल विजय जाधव, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांच्यासह अन्य अधिकारी-कर्मचारी यावेळी उपस्थित होते. 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारताने संविधान स्वीकारले. या घटनेला आज 75 वर्षे पूर्ण होत आहेत. भारतीय संविधान व त्यातील मूल्य, हक्क-अधिकार व कलम यासंबंधी जिल्हाधिकारी कटियार यांनी उपस्थितांना माहिती दिली.



## विद्युत भवना संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन

**अमरावती-** महावितरण विद्युत भवनात आज 26 नोव्हेंबर हा 'संविधान दिन' साजरा करण्यात आला. संविधान दिनानिमित्त मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांच्या नेतृत्वात संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारताने संविधान स्वीकारले. या घटनेला 75 वर्षे पूर्ण होत आहेत. संविधानिक मुल्यांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी 26 नोव्हेंबर हा संविधान दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावेळी अधीक्षक अभियंता दिपाली माडेलवार, सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधूसुदन मराठे, कार्यकारी अभियंता राजेश माहुलकर, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने यांच्यासह अधिकारी, अभियंते व कर्मचारी उपस्थित होते.

## मनपात संविधान दिन साजरा करित शहिदांना श्रध्दांजली

**अमरावती** - संविधान दिवसा निमित्त्ाने भारतीय संविधानाच्याा उद्देशिकेचे सामुहिक वाचन अमरावती महानगरपालिका कॉन्फरन्स हॉल येथे सकाळी 11 वाजता महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांच्याि अध्य क्षतेखाली करण्याजत आले. विश्वंरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याा प्रति ?मेस यावेळी हारार्पण करण्यायत आले. 26 नोव्हेंबर च्यान हल्यााबा



त शहीद झालेल्या बांधवांना यावेळी श्रध्दां जली देण्याणत आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पाा नाईक, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, नरेंद्र वानखडे, योगेश पिठे, श्या मसुंदर देव, मुख्यंलेखापाल दत्तात्रय फिस्केघ, शहर अभियंता ईश्वतरानंद पनपालिया, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, कार्यालय अधिक्षक नंदकिशोर पवार, उद्यान अधिक्षक श्रीकांत गिरी, मालमत्ता, अधिकारी दिपक खडेकार, वैद्यकीय अधिकारी डॉ.स्वाअती कोवे, सहाय्यक प्रकल्प संचालक वंदना गुल्हालणे, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे आदी अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येकने उपस्थित होते.

# अवधुती मांड सप्ताह उत्सव

## श्री संत भारती महाराज व ओम अवधूत महोत्सव समितीकडून आयोजन





**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी,( दि.26 )** - दरवर्षी प्रमाणे यावर्षीच्या अवधूत स्वरुपी भारती महाराज यांच्या अवधुती मांड सप्ताह उत्सव मिती कार्तिक वद्य दशमी दि.25 नोव्हेंबर पासुन ते मार्गशीष शुद्ध प्रतिपदा दि.2 डिसेंबर पर्यंत आयोजन करण्यात आले आहे.

दररोज नित्यनियमाणे दि.25 नोव्हेंबर ते 2 डिसेंबर पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमामधून अवधूत भजन, कीर्तन, भजनी मंडळाकडून जागृती भजनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. कालच्या किर्तनानंतर अवधूत भजनी मंडळीची मांड ह.भ.प.परमभक्त हरिभाऊ दुर्गे, सुरेश ठाकरे, लहानुजी वानखडे, जगदिश तिजारे(पुणे) यांच्या किर्तनाने होईल. काल्याचे कितर्न प्रभाकर श्रीसाट, सचिव संत भारती महाराज व ओम अवधूत समिती,पहूर( दाभा) यवतमाळ तसेच मुख्य योग शिक्षक एवं मार्गदर्शक जिल्हा पतंजली योग समिती, अमरावती यांच्या वाणी द्वारे श्री संत श्रावण महाराज यांच्या नारायण गीतेवर होईल, गावातून रमणा निघेल व तो भारती महाराज संस्थानच्या मंदिरात येऊन पुर्ण होईल. आरती व महाप्रसादने अवधूत महोत्सवाची सांगता होईल, तसेच दि.3 डिसेंबर रोजी आलेल्या अवधूत मांडीचा रात्रभर गजर होऊन अवधुत प्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात येणार आहे.

### गीतेचा मराठी अनुवाद ग्रंथाचे विमोचन

भगवत् गीतेचे संस्कृतमधून मराठीत रूपांतर श्री संत श्रवण महाराज यांनी केले तसेच क्रांती भास्कर ब्राह्मज्ञानयोगाचार्य श्री संत श्रावण महाराज उमरतकर विरचित श्रीमत् भागवत गीते वरील मराठी संस्करण वैद्य विदर्भीय ज्ञानेश्वरी %श्री नारायणी गीता% गीतेचे मराठीत रुपांतरण संपादक प्रभाकर श्रीसाट व पत्नी प्रकाशिका निर्मला श्रीसाट यांच्या ग्रंथाचा विमोचन व लोकापर्ण सोहळा आयोजित करण्यात येणार आहे.

# चाकूने महिलेवर वार

**अमरावती** - मोर्शी पोलीस ठाणे हद्दीतील हिवरखेड येथे 40 वर्षीय महिलेवर चाकूने वार करण्यात आले. महिलेच्या सासूच्या घराजवळ राहणारा आरोपी करण बंडू सिलेवार हा दारू पिऊन आला व त्याने महिलेच्या पतीला मारहाण केली. त्यावेळी महिला भांडण सोडविण्यासाठी गेली असता आरोपी करणने घरातून चाकू आणून महिलेच्या हातावर वार केला. ज्यात ती जखमी झाली. महिलेच्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी करण सिलेवार व बंडू सिलेवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.


## सार्वजनिक सूचना

माझ्या पक्षकाराने दिलेल्या माहिती आणि अधिकार आणि कागदपत्रांच्या आधारे, मी सर्व लोकांसाठी ही सार्वजनिक नोटीस जारी केली आहे. की हक्कसोड लेखाची मूळ प्रत जी ज्योती लिलाधर भेले, कु. साक्षी लिलाधर भेले, कु. संजना लिलाधर भेले लिहुन देनार म्हणून आणि ऊत्कर्ष लिलाधर भेले लिहुन घेणार म्हणून दरम्यान अंमलात आणली गेली आहे. हा हक्कसोडलेख नोंदनीकृत नसुन सदर हक्कसोड लेख मुळ प्रती हरवली आहे. ह्या नोटिस द्वारे सर्वत्र लोकांस कळविणेत येते की ज्या कुणाचा ह्या खरेदी संबंधात कोणताही हितसंबंध किंवा हक्क वा उजर किवा ताबा असेल तसेच कर्ज असेल किंवा अधीकार असेल त्याकरीता नोटिस प्रकाशीत झालेपासुन 07 (सात) दिवसाचे आत खालील पत्यावर माहीती वा संबंधीत कागदपत्रांचा पुरावा सादर करावा. ह्यानंतर कोणताही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी

शिक्का

**स्वाक्षरी**
**ॲड. प्रविण भुस्कडे**
**सांगेकर नगर**
**भक्तिधाम रोड, चांदूरबाजार**
**जिल्हा अमरावती.**
**मो. क्रमांक 8788355988**